जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/१२/२०२४
## दि.१४/१२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ७३९/२०२४, भा.न्या.सं.कलम ३०९(४),३५२,३(५), आर्म ॲक्ट कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधि.३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २५ वर्षे, रा.वडगाव बु.पुणे |
| **आरोपीत** | ॲक्टीव्हा वरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/१२/२०२४ रोजी रात्रौ २१/४५ वा.चे सुमारास विठ्ठलवाडी ते वडगाव दरम्यान असलेल्या कॅनॉल रोडवरील संतोष हॉलकडे जाणाऱ्या रस्त्याचे पुढे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मोटार सायकल वरुन घरी जात असताना वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी आले असता त्यांचे पाठीमागुन आलेल्या ॲक्टीव्हा वरील दोन इसमांपैकी गाडी चालविणाऱ्या इसमाने तु गाडी हळु हा चालवतोस" अशी विचारपुस करुन काहीएक कारण नसताना फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ केल्याने फिर्यादीने त्यांची गाडी थांबविली असता, ॲक्टीव्हा गाडीवरील चालकाने त्याची गाडी फिर्यादीचे गाडीच्या पुढे उभी केली व पाठीमागे बसलेला इसम ॲक्टीव्हा गाडीवरुन उतरुन फिर्यादी यांचे जवळ आला व काहीएक कारण नसताना फिर्यादीस पुन्हा वाईट वाईट शिवीगाळ करुन त्याने त्याचे कमरेस लावलेले लोखंडी हत्यार बाहेर काढुन फिर्यादीचे गळयास लावुन फिर्यादी यांचे जिन्स पॅंटचे पाठीमागील बाजुस उजवे खिशात ठेवलेले ५०,०००/- रुपये रोख जबरदस्तीने काढुन घेऊन पळुन गेले |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.भांडवलकर मो.नं.९७६६६९३३३६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ४६८/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४) सह माहीती तंत्रज्ञान अधि कलम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६६ वर्ष रा.भवानीपेठ पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल,ईमेल आय डी,बॅंक खाते धारक वापरकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१२/२४ रोजी ते दि.०३/१२/२०२४ रोजी पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे गुगल वेबसाईटवर जाहिरात पाहत असताना यातील नमुद ईमेल आय डी धारक यांनी अॅप्लीकेशनमध्ये फिर्यादी यांचे नाव,पत्ता,मो.नं,आधार कार्ड,पॅन कार्ड व इनकम टॉक्सीची माहिती भरुन रजिस्ट्रेशन करण्यास सांगुन zudiofranchise साठी व zudio मटरेल स्टॉककरीता फिर्यादी यांना त्यांचे बॅंक खात्या मधुन त्यांचे बॅंक खात्या मध्ये पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडून फिर्यादी यांची एकूण १०,४९,५००/- रुपये ची अर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) श्री.सुतार मो.नं.९९२३४३६०६० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ५२२/२०२४, भा.न्या.सं.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४५ वर्षे रा.कोल्हापूर |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१२/२०२४ रोजी सकाळी ११/१५ वा. सुमार स्वारगेट बस स्टॅण्ड,स्वारगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया,वर नमुद ता.वेळी व ठिकाणी स्वारगेट बस स्टॅण्ड येथे फिर्यादी,त्यांचे |

| | |
|---|---|
| | पती व जावई असे नाशिक ते मलकापूर या कोल्हापूरकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमती शिवाय,त्यांची नजर चुकवून त्यांच्या हॅण्डपर्सची चैन उघडून सोन्याचे दागिने ठेवलेले एक पोपटी रंगाची छोटी पर्स त्या मध्ये एकूण १०,४००/- रु.किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अशोक पाटील,मो.नं.७३५०६२६२०५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ३१९/२०२४, भा.न्या.सं.कलम ३०४,३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७४ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | दुचाकी वरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/१२/२०२४ रोजी २२/३० वा.चे सुमारास नवरंग मित्र मंडळ गणपती मंदिराजवळ, सिल्व्हर इस्टेट जवळ,बिबवेवाडी,पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे शतपावली करुन हातात मोबाईल धरुन तो पाहत पाहत राहते घरी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे समोरुन येवून त्यांना बाबा,बाबा असा आवाज देवून त्यांचे हातातील ८,०००/- रु.किं.चा मोबाईल हिसकावून घेवून पळून गेले. |
| **त.अंमलदार** | पो.अमंलदार जाधव, मो.नं.८८०६०४५५३७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४९४/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४३ वर्ष रा.वारजे पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल,टेलिग्राम आयडी धारक वापरकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ११/११/२०२३ रोजी ते १६/४/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल,टेलिग्राम आयडी धारक वापरकर्ते यांनी फॉरेक्स ट्रेंडींगमध्ये तसेच इंडीयन शेयर ट्रेडींगमध्ये जास्तीत जास्त नफा मिळवुन देतो असे आमिष दाखवुन ॲप डाऊनलोड करण्यास बँक अकाउंट वर पैसे जमा करण्यास सांगुन फिर्यादी यांची एकुण १५,२७,०२९/-रु.ची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) श्री.बडाख मो.नं.८८५२३६९८५६ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २०९/२०२४, भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४० वर्ष रा.प्रभात रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/१२/२०२४ रोजी दुपारी १३/०० वा.ते दि.१४/१२/२०२४ रोजी सायंकाळी १७/०० वा.चे दरम्यान ७८९ शांतीकुंज, रविराज हॉटेलचे बाजूला, भांडारकररोड, डेक्कन पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे चुलते यांचा राहाता बंगला वर नमुद केले ता.वेळी कुलूप लावून बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने बंगल्याचे तळमजल्यावर असलेल्या बाथरुमचे खिडकीचे गज कशाचेतरी सहाय्याने काढून काचा काढून खिडकीवाटे घरात प्रवेश करुन वरील मजल्यावरील बेडरुमच्या दरवाजाचा कडी कोयंडा उचकटून तसेच बेडरुमचे बाजूला असलेल्या रुम मधील तीन लोखंडी कपाटे तसेच एक लाकडी कपाट उचकटून लोखंडी कपाटात ठेवलेली रोख रक्कम ५०,०००/- रु.व तळमजल्यावर असलेल्या देवघरातील चांदीचे देवाचे दागिने असा एकूण १,००,०००/-रुपये किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी करुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अजय भोसले,मो.नं.८६५२७४४६४७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**